<table>
<tr><td rowspan="5">MHKO050023492015</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">१३/०८/२०१५</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">१३/०८/२०१५</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०२/०७/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>१०</td><td>१०</td><td>१९</td></tr>
</table>

**इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी ए. एम. गायकवाड)**
न्यायनिर्णय घोषीत दिनांक - ०२/०७/२०२६

| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०७५/२०१५** | **निशाण क्र. ६७/ब** |
|---|---|

पोलीस ठाणे - निरंक

| | |
|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | रणजित लायकर टेक्सटाईल,<br>तर्फे रणजित दिलीप लायकर,<br>वय ४२ वर्षे, व्यवसाय – व्यापार,<br>रा. ५/२५, शाहू कॉर्नर, इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे | श्री. यू. व्ही. जाधव. |
| आरोपी | **सदानंद शंकर ढवळे,**<br>व. सज्ञान, व्यवसाय – व्यापार,<br>रा. ७/२०२, गांधी कॅम्प, इचलकरंजी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. एस. जी. कुलकर्णी |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३/०७/२०१५ |
| फिर्याद दाखल दिनांक | १३/०८/२०१५ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | निरंक |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | २६/११/२०१५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०१/२०१६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | - |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | - |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सदानंद शंकर ढवळे | लागू नाही | २६/११/२०१५ | पारक्रम्य अधिलेख नियम १८८१ कलम १३८ प्रमाणे | अंतिम आदेशा प्रमाणे | | निरंक |

## भाग-क
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)
## फिर्यादी पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

### अ. फिर्यादी पक्ष साक्षीदार

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रणजित दिलीप लाटकर | फिर्यादी | १४ |
| २ | प्रशांत बाबुराव फाटक | साक्षीदार | ३९ |

### ब. बचाव पक्ष साक्षीदार

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयामार्फत साक्षीदार

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

### फिर्यादीपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

### अ. फिर्यादी पक्षातर्फे

| अनु क्र. | निशाण क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | १५ | मुळ धनादेश क्र.५८१५६५ |
| २. | १६ | चेक रिटर्न मेमो दि.१६/०६/२०१५ |
| ३. | १७ | नोटीस दि.०२/०७/२०१५ |
| ४. | १८ | पोस्टाची पोहोच पावती |
| ५. | ५१ | उसनवार पावती |

**ब. बचावपक्षातर्फे**

| **अनु क्र.** | **निशाण क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | .. | .. |

**क. न्यायालयामार्फत**

| **अनु क्र.** | **निशाण क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | ११ | प्ली |
| २. | ५९ | ३१३ |

**ड. मुद्देमालाचे विवरण**

| **मालमत्तेचे वर्णन** | **निशाण क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | .. | .. |

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(पारीत दिनांक ०२ जुलै, २०२६)**

आरोपीविरुध्द सदरील खटला पराक्रम्य लेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये चालवणेत आला आहे.

**फिर्यादी पक्षाचे कथन सारांशाने पुढील प्रमाणे -**

**२.** फिर्यादी हे इचलकरंजी येथे रणजित टेक्सटाईल या फर्मच्या नावाने कापड खरेदी विक्रीचा व्यवसाय व लायकर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या नावाने बांधकाम व्यवसाय करतात. आरोपी हे गांधी कॅम्प, इचलकरंजी येथे त्यांचे घरी घरगुती खानावळ चालवितात व त्याचा वाळूचा व्यवसाय आहे. फिर्यादी हे बिल्डर असल्याने त्यांना बऱ्याच वर्षापासून आरोपी हे त्यांना वाळू पुरवित होते. तसेच आरोपी हे फिर्यादी यांचे चुलते जयवंत लायकर हे चेअरमन असलेल्या शाहू कॉर्नर नागरी सहकारी पतसंस्था इचलकरंजी या संस्थेचे संचालक आहेत. त्यामुळे फिर्यादी यांच्या लायकर घराण्याशी आरोपी यांचे बऱ्याच वर्षापासून मैत्रीचे व सलोख्याचे संबंध होते. आरोपी यांनी फिर्यादी यांच्याकडून वेळोवेळी वाळू व्यवसायाकरीता हातउसनवार रक्कमा यापूर्वी घेतलेल्या होत्या व प्रामाणिकपणे त्या परतही दिलेल्या होत्या. आरोपीने फिर्यादी यांच्याकडे व्यवसायाकरीता रक्कमेची आवश्यकता असल्याचे सांगून एप्रिल २०१५ चे पहिल्या आठवड्यात रक्कम रुपये ३,००,०००/- मागणी केली व फिर्यादीने त्यांना सदरची रक्कम हातउसणवार दिली.

आरोपी यांनी सदर रक्कम स्विकारुन फिर्यादी यांचे लाभात उसन वार पावतीही लिहून दिलेली आहे. सदरची रक्कम ही आरोपी यांनी एक ते दीड महिन्यात परत देण्याचे आश्वासन दिले होते.

३. पुढे त्यांनी असे कथन केले की, फिर्यादी यांनी आरोपीकडे उसनवार दिलेल्या पैशांची मागणी केली असता, आरोपी हा पैसे परत करण्यास टाळाटाळ करु लागला. त्यानंतर आरोपीने रक्कम रुपये ३,००,०००/-(रक्कम रुपये तीन लाख फक्त) इतक्या रक्कमेचा शिवम सहकारी बँक, शाखा इचलकरंजी या बँकेचे चेक क्र.५८१५६५ दि.१३/०६/२०१५ रोजी दिला. सदर चेक वटेल अशी खात्री आरोपीने फिर्यादी यांना दिली. त्यानंतर आरोपीच्या सांगण्यावरुन फिर्यादी यांनी सदरचे चेक युनियन बँक, इचलकरंजी येथे दिनांक १३/०६/२०१५ रोजी वटवणेसाठी भरला असता तो त्याच दिवशी **"Funds Insufficient"** या कारणास्तव परत आला. फिर्यादी यांनी दि.०२/०७/२०१५ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठवली. सदरची नोटीस लागू न होता अनक्लेमड् या शेऱ्याने परत आली. आरोपी यांनी मुदतीत रक्कम न दिल्याने प्रस्तुत खटला फिर्यादीने आरोपीविरुध्द दाखल केला.

४. माझे विद्वान पूर्वअधिकारी यांनी आरोपीला आरोपाचा तपशील नि.११ अन्वये वाचुन दाखवण्यात आला व आरोपीने अपराध नाकबुल असल्याचे सांगितले व न्यायालयासमोर संपरीक्षेची तयारी दर्शवली.

५. फिर्यादीतर्फे स्वतःचा शपथेवरील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.१४ वर दाखल करुन साक्ष नोंदवणेत आली. तसेच साक्षीदार यांच्या सरतपासाचे शपथपत्र नि.३९ कडे दाखल केले. फिर्यादी यांनी नि.क्र.५८ पुरावा बंद केला. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन नि.५९ वर नोंदवणेत आले.

६. फिर्यादीतर्फे वकील श्री. यू. व्ही. जाधव यांनी नि.क्र. ६२ वर लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. त्यांच्या लेखी युक्तीवादाप्रमाणे फिर्यादी यांनी तोंडी व

लेखी पूरावा देऊन आरोपीविरूध्द गुन्हा शाबित केलेला आहे. आरोपी यांनी उसनवार रक्कम घेतल्याचे फिर्यादी यांनी शाबित केले व त्याच रक्कमेपोटी वादातील धनादेश दिलेला आहे. त्यामुळे आरोपी याला दोषी ठरविण्यात येते.

**७.** आरोपीचे विद्वान वकिल श्री. एस. जी. कुलकर्णी यांनी नि.क्र. ६६ वर लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. आरोपी याने फिर्यादी यांच्याकडून कोणतीही रक्कम हातउसणी घेतलेली नाही. फिर्यादी यांनी त्यांच्या व्यवसायासंदर्भात व सदर रक्कमेचा स्त्रोत दाखवण्याकरीता कोणतेही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तथाकथित व्यवहारासंदर्भात कोणताही स्पष्ट पूरावा अभिलेखावर देण्यात आलेला नाही. फिर्यादी हा सावकारकीचा व्यवसाय करत असल्याबाबत पो.स्टे. ला तक्रार दाखल केली होती. फिर्यादी हा सावकारकीचा व्यवसाय करतो ही बाब स्पष्ट आहे. फिर्यादी व त्यांच्या इतर कुटुंबातील व्यक्ती देखील अशाच प्रकारच्या व्यवसायामधून चेक घेत असतात.

८. तसेच पुढे युक्तिवाद केला की, Negotiable Instruments Act च्या कलम ११८(a) नुसार प्रत्येक Negotiable Instruments Consideration साठी दिलेला आहे. असे प्राथमिक गृहीत धरणे निर्माण होते. तसेच कलम १३९ नुसार धनादेश धारकांच्या फायद्यासाठी असे गृहीत धरले जाते की, संबंधीत धनादेश पूर्ण किंवा अंशतः कायदेशीर दृष्टया वसूल करता येण्या जोग्या देण्याच्या परतफेडीसाठी दिलेला आहे. या गृहीतकांचा उद्देश व्यवहाराच्या प्रारंभिक टप्प्यांवर धारकास सहाय्य करणे हा असला तरी ती गृहीतके अंतिम किंवा अपरिवर्तनीय नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने Rangappa Vs. Shri Moham (२०१०)११ SCC ४४१ या निर्णयात स्पष्ट केले आहे की, आरोपीस स्वतःचा बचाव दोषारोपाप्रमाणे शंकातीत/निर्विवादपणे सिध्द करण्याची आवश्यकता नसून केवळ संभाव्यता दर्शवुन किंवा वाजवी शंका निर्माण करून तो गृहितके खंडीत करू शकतो. त्याच प्रमाणे Basalingappa Vs. Mudibasappa (२०१९) SCC ४१८ या निर्णयास नमूद केल्याप्रमाणे जेव्हा आरोपी आर्थिक क्षमता, व्यवहाराचे अस्तीत्व किंवा परिस्थिती यावर प्रश्न उपस्थित करतो, तेव्हा फिर्यादी अर्जदार

यांचेवर त्याबाबत ठोस व विश्वासार्ह पूरावा सादर करण्याची जबाबदारी येते. तरी अर्जदार यांना कथित देणे निर्विवाद व विश्वासार्ह पुराव्याने सिध्द करण्यात अपयश आलेले आहे. सबब त्यांनी आरोपीस निर्दोष मुक्त करण्याची विनंती केलेली आहे.

**९.** अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता खालील मुद्दे माझ्या विचारात घेऊन व त्यावरील मी माझा कारणमीमांसेसह निष्कर्ष देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने दि.१३/०६/२०१५ रोजी शिवम सहाकरी बँक, शाखा इचलकरंजी चे धनादेश नं. ५८१५६५ हे फिर्यादी यांच्या कडून घेतलेले कायदेशिर रक्कम फेडण्याकरिता दिला होता हे सिध्द होत आहे का ? | **होकारार्थी** |
| २. | धनादेशाचा अनादर करुन पराक्रम्य लेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार आरोपीने अपराध केल्याचे सिध्द होत आहे का ? | **होकारार्थी** |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**१०.** फिर्यादीने दाखल केलेल्या पुराव्याचे आधारे पारक्राम्य लेख अधिनियम,१८८१ कलम १३८ अन्वये गुन्हा सिध्द झाला आहे किंवा नाही हे पाहताना संबंधीत कायद्यातील तरतुदी काय सांगतात याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच आरोपी याने त्याचा बचाव प्राबल्याच्या शक्यतेवर दिलेला आहे की नाही ते देखील पाहणे आवश्यक आहे.

## कायदेशिर बाब

**११.** फिर्यादी व आरोपी पक्षाची बाजु जाणुन घेण्यापूर्वी अथवा पुराव्याचे अवलोकन करण्यापूर्वी पराक्रम्य लेख अधिनियम,१८८१ चे कलम १३८ चे मुलभूत घटक काय आहेत तसेच, संबंधित अधिनियमाचे कलम ११८ व १३९ मधील गृहितके व त्यांची व्याप्ती देखील लक्षात घेणे जरुरीचे आहे.

**१२.** संबंधित अधिनियमाचे कलम १३८ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी खालील नमुद गोष्टी या क्रमबध्द सिध्द होणे गरजेचे आहे.

अ) आरोपीने फिर्यादीला कायदेशीर देणेपैकी अंशतः किंवा पूर्णतः रक्कम फेडण्याकरिता धनादेश दिला.

ब) फिर्यादीने सदरील धनादेश मुदतीत वटण्यासाठी भरला.

क) सदर धनादेश न वटल्याने अनादरित झाला.

ड) फिर्यादीने सदर धनादेश परत आल्यापासून एक महिन्याच्या आत लेखी सूचना पाठवून धनादेशाच्या रक्कमेची मागणी आरोपीकडे केली.

ई) आरोपीने लेखी सूचना मिळाल्यापासून, १५ दिवसांच्या आत धनादेश रक्कम फिर्यादीस परत केली नाही.

उ) सदरील रक्कम आरोपीने संबंधित कालावधीत परत न केल्यास फिर्यादीने खटला एक महिन्याचे आत दाखल करणे जरुरीचे आहे.

ऊ) सदरचा धनादेश हा कायदेशीर रक्कम परतफेडीपोटी दिलेला होता.

**१३. कलम ११८- जो देवाण घेवाणीचा दस्त आहे तो मोबदला मिळवण्याच्या संदर्भातील आहे असे गृहित धरण्यासंबंधी** - जर धनादेश हा त्याच्या कायदेशीर मालकाकडून किंवा कायदेशीर ताबा असलेल्या व्यक्तीकडुन प्राप्त झाला असेल तर, जोपर्यंत विरुध्द परिस्थिती सिध्द होत नाही तोपर्यंत सदर धनादेशावरील रक्कम स्वीकारण्यासंबंधीची तारीख, हस्तांतरणाची तारीख, शेरे मारण्याच्या संदर्भातील क्रमांक, तिकीटासंबंधी व धारण करणारा हा योग्य रितीने धारण करणार आहे असे योग्य समजावे. कोणत्याही देवाण-घेवाणीच्या दस्ताच्या संदर्भात म्हणजे पराक्रम्य लेख धारण करण्याच्या संदर्भात तो योग्य रितीने धारण केलेला आहे व क्रमानुसार धारण केलेला दस्त आहे असे समजावयाचे.

**१४. कलम १३९ धारण करणा-याच्या वतीने गृहित धरणे** - कलम १३८ मध्ये नमुद केलेल्या रितीचा धनादेश धारण करणा-याने तो बँकेला सादर करुन अंशतः किंवा पूर्णतः त्याचे पैसे मिळवण्याच्या हेतूने धारण केला होता व तो त्याचे येणारे कर्ज किंवा दायित्वाच्या संदर्भात धारण करतो. परंतु, याविरुध्द वस्तुस्थिती आहे हे सिध्द केले गेले असल्यास गोष्ट अलहिदा.

**१५.** आरोपीने सदर गृहितके खंडन करताना प्राबल्याचे शक्यतेवर खंडन केले तरीही पुरेसे आहे. त्यासाठी, आरोपीने संशयापलीकडे त्याचा बचाव शाबित करणे अपेक्षित नाही.

**१६.** सदरकामी, जरी संबंधित तरतुदींनुसार आरोपी विरोधात संबंधित कायद्यान्वये गृहितके धरुन चालणे अपेक्षित असले तरी काही बाबी या फिर्यादीने सुरुवातील न्यायालयापुढे दाखवून देणे अपेक्षित आहे व त्याची सुरुवातीची जबाबदारी (initial burden) फिर्यादीवर आहे व जेव्हा आरोपीविरुध्द फिर्यादी सुरुवातीची जबाबदारी (initial burden) पार पाडतो, त्यानंतर गृहितकांच्या आधारे संबंधित कायद्यातील कलम ११८ व १३९ ची गृहितके आरोपीविरुध्द लागू पडतील व त्यावेळी त्याने गृहितके खंडन करण्यासाठी प्राबल्याची शक्यता या धर्तीवर पुरावा दिला तरी पुरेसा असतो व आरोपीने त्याचा बचाव अथवा गृहितकांचे खंडन हे संशयापलीकडे सिध्द करणे अपेक्षित नाही व जर आरोपीने त्या धर्तीवर पुरावा दिला अथवा त्या अनुषंगाने योग्य तो बचाव घेवुन फिर्यादीच्या आरोपांचे प्राबल्याच्या शक्यतेवर खंडन केले तर मग मात्र फिर्यादीने खटल्यामध्ये केलेले आरोप हे निःसंदिग्धपणे संशयापलीकडे सिध्द करणे जरुरीचे असते.

**१७.** प्रस्तुतच्या खटल्याकामी सुरवातीची जबाबदारी (initial burden) ही फिर्यादीने पार पाडले आहे का, की जेणेकरुन कलम ११८ व १३९ गृहितके आरोपीला लागू पडण्यासारखी केस फिर्यादीने दाखवून दिली आहे का ही महत्वाची बाब पाहणे जरुरीचे आहे. त्याप्रमाणे, फिर्यादीने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन त्या अनुषंगाने करणे आवश्यक वाटत आहे.

**<u>मुद्दा क्रं.१ व २ करिता</u>**

**१८.** सदरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असुन सोईकरिता ते एकत्रीतपणे चर्चीले आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये रक्कमेची देवाण-घेवाण झाली होती किंवा नाही व आरोपी यास दिलेली रक्कम ही enforceable debt आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. तसेच आरोपी याच्या बचावाप्रमाणे सदरची रक्कम ही आरोपी याने उसनवार घेतली होती की नाही हे देखील पहावे लागेल. या अनुषंगाने

अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन करण्यात आले. फिर्यादी रणजित दिलीप लायकर (साक्षीदार क्र.१) यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१४) दाखल केले. फिर्यादी यांनी फिर्यादीमध्ये कथन केलेल्या आरोपांची पुनरावृत्ती त्यांच्या पूराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये केलेली आहे. सदर फिर्यादी यांनी त्याच्या उलटतपासामध्ये काही बाबी मान्य केल्या जसे की, फिर्यादी हे रणजित लायकर टेक्सटाईल्स व लायकर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या नावाने व्यवसाय करतो. तसेच आरोपी याचा वाळूचा व घरगूती मांसाहारी खानावळ चालविण्याचा व्यवसाय आहे हे दाखविण्याकरीता कागद दाखल केलेले नाहीत. सदर साक्षीदार यांच्या उलटतपासात पुढे असे आले आहे की, शाहु कॉर्नर नागरी पतसंस्था चे कार्यालय शहराच्या मध्यवर्ती असून त्याचे चेअरमन जयवंतराव लायकर हे फिर्यादीचे काका आहेत. तसेच त्यांच्या लहान भावाची पत्नी शितल लायकर, भाऊ अजित लायकर त्यांची पत्नी रेश्मा, चुलत भाऊ युवराज लायकर, काका राजू लायकर या सर्वांशी फिर्यादीचा चांगला संपर्क असून हे सर्व लोक पतसंस्थेचे सभासद आहेत. आरोपी हा सन २००७ ते २०१३ या कालावधीत संस्थेचा संचालक होता. फिर्यादीने पुढे मान्य केले की, आरोपी याने त्याच्याविरूध्द सावकारी व्यवसाय करतो व मारहाण, शिविगाळ अशा आशयाची तक्रार पोलिसांच्याकडे दिली होती, त्या अनुशंगाने त्यांची चौकशी झाली होती. तसेच पोलिसांनी फिर्यादी यांना आरोपीस मारहाण करू नये अशी ताकीद दिली होती. सदर तक्रारीमध्ये अशोक आवळे या व्यक्तीचे नाव देखील होते.

**१९.** सदर साक्षीदार यांनी उलटतपासामध्ये नाकारले की, पतसंस्थेतील रक्कमा तो चढ्या भावाने ते गरजूंना देतात. सदर साक्षीदारांच्या उलटतपासात असे आले आहे की, तथाकथित नमूद व्यवहारातील रक्कम आरोपी याने कधी मागितली होती, व त्यांना कधी दिली होती, कधी परत केली याबाबतचा उल्लेख नाही, साक्षीदार यास निश्चीत तारीख व वार आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. सदर साक्षीदार यास उत्पन्न कर रिटर्न यावरती प्रश्न विचारण्यात आला. साक्षीदाराने मान्य केले की, वाद व्यवहारातील नमूद रक्कम रिटर्न मध्ये दाखवली हे दाखविण्याकरीता दस्तऐवज दाखल केले नाहीत. फिर्यादी याने आरोपीकडून वचनचिठ्ठी, मुद्रांक व

इतर दस्त घेतला नाही. तसेच सदरची रक्कम कोठे, कोणासमक्ष, कोणत्या तारखेस दिली याबाबत फिर्यादीमध्ये नमूद केले नाही.

**२०.** सदर साक्षीदार यांनी उलटतपासात मान्य केले की, त्यांच्या पत्नीने आरोपीविरूध्द चेक रक्कम रू.२,००,०००/- मागणी करीता केस दाखल केल्या होत्या. तसेच अजित याने सक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११०५/२०१५, युवराज याने संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११०६/२०१५ हे त्यांच्याविरूध्द दाखल केला होता. इतरांनी देखील आरोपीविरूध्द फौजदारी केसेस दाखल केलेल्या आहेत. सदर साक्षीदार यांनी नाकारले की, अशोक आवळे, अमोल आवळे, प्रदिप कांबळे यांनी देखील आरोपीविरूध्द केसेस दाखल केले. तसेच फिर्यादी व त्यांच्या इतर नातेवाईकांनी मिळून खोटे दस्तऐवज दाखल करून इतर प्रकरणे आरोपीविरूध्द दाखल केल्याचे साक्षीदाराने नाकारले. फिर्यादी यांनी उलटतपासामध्ये नाकारले की, आरोपी यांनी उसनवार पावती तयार करून दिली नाही. सदर उसनवार पावती, पोहोच पावती, वरील सही आरोपीची नाही. सदर साक्षीदार यांनी नाकारले की, ते व त्यांचे नातेवाईक बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करतात व त्यामध्ये अशोक आवळे, अमोल आवळे, प्रदिप कांबळे व भरत बिनरगी हे वसूली पथकात काम करतात. आरोपी याच्याकडून १५ कोरे धनादेश घेतले व त्यांचा संगणमताने दुरूपयोग करून इतर प्रकरणे दाखल केल्याचे साक्षीदाराने नाकारले.

**२१.** यानंतर फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ प्रशांत फाटक याच्या पूराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, आरोपी व फिर्यादीस ते ओळखतात. दि. ०६/०४/२०१५ रोजी आरोपी व ते फिर्यादी यांच्याकडे गेले. आरोपी यांनी फिर्यादीकडे उसनवार रक्कम रू. ३,००,०००/- ची मागणी केली. त्यावेळी आरोपीस रक्कम दिल्यानंतर उसनवार पावती त्यांच्या समक्ष लिहिण्यात आली. त्या उसनवार पावती नि.क्र. ५१ वर त्यांची व आरोपीची सही आहे. सदर साक्षीदार यांचा उलटतपास आरोपीच्या वकीलांतर्फे घेण्यात आला. त्यामध्ये असे आले आहे की, सदर साक्षीदार कोठे नोकरी करतो, याचा तपशील त्यांनी नमूद केलेला नाही. साक्षीदार हा त्यांची संस्था सेंट्रल कंझ्यूमर धान्याचे दुकान येथे

कामाला आहे. आरोपी व फिर्यादी हे शाहु कॉर्नर पतसंस्थेमध्ये संचालक असल्याचे त्यांनी नाकारले. कोर्ट कागदपत्र बघण्यास त्यांनी परवानगी घेतली नाही. आरोपी यांनी त्यांना सोबत बोलावले हे दाखवण्याकरीता इतर पूरावा नाही. ऊसनवार पावती छापील नमून्यात आहे, रिकाम्या जागा त्यांनी स्वतः भरलेल्या नाहीत. तसेच ऊसनवार पावतीमध्ये किती नोटा किती रक्कमेच्या होत्या याचा उल्लेख नाही. सदर साक्षीदाराने नाकारले की, त्यांनी सांगितल्याप्रमाणे कुठलीही रक्कम आरोपीला मिळालेली नाही. सदर साक्षीदाराने मान्य केले की, रेश्मा लायकर यांच्यामार्फत दाखल केलेले एस सी सी १०७६/२०१५ यामध्ये देखील त्यांनी साक्ष दिलेली आहे.

२२. सदर खटल्याचे काम आरोपी यांनी पूरावा दाखल केलेला नाही, असे असले तरी, जरी आरोपी यांनी त्याचा बचाव हा preponderance of probability म्हणजेच फिर्यादी याचे पुराव्याचे खंडण करणे इतपत दिला असेल तर आरोपी त्याचा बचाव शाबित करू शकतो. आरोपी यांनी घेतलेल्या बचावामध्ये फिर्यादी यांनी दाखल केलेल्या पुराव्याचे खंडण झाले आहे की नाही पाहणे आवश्यक आहे. सदर आरोपी यांनी उलटतपासामध्ये प्रश्न विचारून चेक रक्कम मागणी नोटीस, वादातीत धनादेश, धनादेशावरील सही व आरोपी व फिर्यादीमधील व्यवहार पूर्णपणे नाकारले आहे. सदर आरोपी यांनी उलटतपासामध्ये बचाव घेतला की, फिर्यादी व त्यांचे इतर नातेवाईक यांचा सावकारकीचा व्यवसाय असून आरोपीकडून १५ कोरे धनादेश घेतलेले आहेत व त्या धनादेशाचा गैरवापर फिर्यादी यांनी केलेला आहे. त्या अनुशंगाने त्यांनी आरोपीवर दाखल असलेले फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी कलम १३८ अन्वये दाखल केलेले फौजदारी केस नंबर १०७७/२०१५, १०७६१/२०१५, ११०६/२०१५, ११०४/२०१५ चा उल्लेख उलटतपासामध्ये केला. सदरच्या केसेस आरोपीविरूध्द दाखल असल्याचे फिर्यादी यांना माहिती आहे. फिर्यादी याची केस व आरोपी याने घेतलेला बचाव याचे अवलोकन अभिलेखावर आलेल्या पूराव्यावरून करण्यात आले.

**२३.** आरोपी यांनी उलटतपासामध्ये धनादेश रक्कमेच्या मागणीची नोटीस मिळाली नसल्याचे नाकारलेले आहे. परंतु आरोपी यांनी सदर खटल्यामध्ये, मागणी नोटीसमध्ये नमूद असलेला पत्ता नाकारलेला नाही. तसेच पोस्टाची पोहोच पावती यावर त्यांची असलेली सही आरोपी यांनी नाकारलेली आहे, तसेच सदरची सही आरोपीची नाही हे शाबित करण्याकरीता Probable Defence आरोपी यांनी आणलेला नाही.

**२४.** याच अनुशंगाने आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी **<u>सी. सी. अल्वी अजी</u>** या न्यायनिर्णयामध्ये सर्वसाधारण व्याक्खंड अधिनियम १८९७ चे कलम २७ व भारतीय पुरावा कायदा कलम ११४ च्या तरतुदी विचारात घेवुन जी व्यक्ती मागणी नोटीस बजावणी केली नाही असा बचाव घेते त्या व्यक्तीने न्यायालयाचे समन्स मिळाल्यावर १५ दिवसात रक्कम भरणे जरुरीचे आहे असे निरीक्षण नोंदवले. सदर न्यायनिर्णयाचा विचार करता आरोपीने नोटीस मिळाली नाही असे जरी म्हटले तरी आरोपीने नोटीस मिळाल्यानंतर रक्कम भरणेबाबत तजवीज केली नाही. त्यामुळे आरोपीस नोटीस मिळाली असाच तर्क काढणे योग्य राहील. आरोपी यांनी बचावामध्ये तो अभिलेखावर नमूद असलेल्या पत्यावर राहणेस नव्हता याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन आरोपी यास मागणी नोटीस ही मिळाली आहे असा तर्क काढणे योग्य राहिल.

**२५.** आरोपीचे वकिलांनी फिर्यादी याच्या उलटतपासामध्ये वाद धनादेशावर आरोपीचे स्वाक्षरी नाही असा बचाव घेतलेला आहे. त्याअनुषंगाने पुराव्याचे अवलोकन केले असता त्यामुळे वादातील धनादेश हा फिर्यादी व आरोपी यांच्यामध्य ऊसनवार झालेल्या रकमेपोटी देणेत आला आहे असे फिर्यादीचे कथन आहे. आरोपी याने घेतलेला उलटतपासात मान्य केले की, कोरे धनादेश फिर्यादीच्या ताब्यामध्ये दिलेले आहेत. आरोपी यांनी जरी चेकवरील त्याची स्वाक्षरी नाकारली असली तरी त्या अनुशंगाने बचाव पूरावा देऊन सदर वादातील धनादेशावर आरोपीची सही कशी आली याबाबत पूरावा आलेला नाही. तसेच सदर कोऱ्या धनादेशावर आरोपीची सही नव्हती असा बचाव आरोपीने घेतलेला नाही.

त्यामुळे आरोपी याने धनादेशावर आरोपीची स्वाक्षरी नाही अशा घेतलेल्या बचावामध्ये तथ्य नाही.

२६. आरोपी याने बचाव पक्षामध्ये आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये ऊसनवार पावती (निशानी क्र. ५१) नाकारलेली आहे. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे आरोपीचा वाळू व्यवसाय असल्याने आरोपीने त्याच्याकडून वादातीत रक्कम ऊसनवार पावतीनुसार घेतलेली आहे. फिर्यादी याने पूरावा दाखल करून ऊसनवार पावती शाबित केलेली आहे. या अनुशंगाने फिर्यादी यांनी घेतलेल्या बचावाचे अवलोकन केले असता, आरोपी याने ऊसनवार पावती व त्याची सही नाकारलेली आहे. परंतु फिर्यादी याने ऊसनवार पावती वरील साक्षीदार क्र. २ प्रशांत पाठक (नि.क्र. ३९) याचा पूरावा अभिलेखावर आणला. सदर साक्षीदार याने देखील ऊसनवार पावती शाबित केलेली आहे. सदर साक्षीदार क्र. २ यांनी ऊसनवार पावतीच्या अनुशंगाने दिलेल्या पूराव्याचे खंडण आरोपी यांनी preponderance of probability वर केले आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर साक्षीदार यास तो नोकरी कुठे करतो, आरोपी याने कोणत्या कारणासाठी त्याला बोलावले होते, ऊसनवार पावती छापील स्वरूपात असून रिकाम्या जागा त्यांनी भरलेल्या नाहीत. या अनुशंगाने प्रश्न विचारण्यात आले. तसेच सदर साक्षीदाराच्या प्रतिज्ञापत्रमध्ये रेव्हेन्यू तिकीट लावण्यासंदर्भात मजकूर नमूद नाही या अनुशंगाने प्रश्न उपस्थित केला आहे. आरोपीस कोणत्या नोटांच्या स्वरूपात रक्कम देण्यात आली यासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला. सदर साक्षीदार यांनी एस. सी. सी. केस नं.१०७६/२०१५ यामध्ये देखील ऊसनवार पावतीसंदर्भात साक्ष नोंदविल्याचे मान्य केले आहे. आरोपी यांनी उलटतपासामध्ये प्रश्न विचारून सदर साक्षीदार याची विश्वासार्हता आव्हानित केली आहे. सदर साक्षीदार हा दुसऱ्या केसमध्ये देखील ऊसनवार पावतीचा साक्षीदार म्हणून आहे असे असले तरी एक व्यक्ती अनेक ऊसनवार पावतीवर साक्षीदार असू शकत नाही असा कायदा सांगत नाही. साक्षीदार क्र. २ हा फिर्यादी यांच्याकडे नोकरीस नसला तरी त्यांच्या संस्थेमध्ये कामाला आहे. फिर्यादी व आरोपीस तो ओळखतो. सदर साक्षीदार यांनी ऊसनवार पावतीवरील मजकूर मान्य केला. सदर साक्षीदार हा ऊसनवार पावतीच्या वेळी हजर

नव्हता ही बाब आरोपी याने बचावामधून शाबित केलेली नाही. त्यामुळे ऊसनवार पावती ही शाबित झालेली आहे. सदर साक्षीदार यांनी खोटे कागदपत्र तयार केले ही बाब आरोपी यांनी शाबित केलेली नाही.

**२७.** जरी आरोपी यांनी त्याचा बचाव हा preponderance of probability म्हणजेच फिर्यादी याचे पुराव्याचे खंडण करणे इतपत देणे आवश्यक आहे. आरेपी याचा बचावाच्या पुराव्याचा विचार केला असता आरोपी याने फिर्यादी हा सावकारकी व्यवसाय करतो, असा बचाव घेतला आहे. फिर्यादी यांनी देखील मान्य केले की, आरोपी याने फिर्यादीचे विरूध्द सावकारकीची तसेच धमकी दिली असा गुन्हा दाखल केला होता. परंतु आरोपी याने त्या अनुशंगाने सदर तक्रारीची प्रत दाखल केली नसल्यामुळे सदर रक्कमा व वादातील धनादेश हा सावकारी व्यवसायातून फिर्यादी यांनी घेतला असा बचाव आरोपीचा नाही. सदर आरोपी याने नि.क्र. ५१ वरील उसनवार पावती नाकारली आहे. परंतु सदर उसनवार पावतीवर त्याची सही नाकारलेली आहे परंतु फक्त सही नाकारून आरोपी याने फिर्यादीच्या पूराव्याचे खंडण केले असे होत नाही. फिर्यादीने शपथेवर पूरावा दाखल करून नि.क्र. ५१ वर उसनवार पावती शाबित केलेली आहे. आरोपी याने त्याच्या बचावामध्ये फिर्यादी हा उत्पन्न कर भरतो किंवा कसे या अनुशंगाने प्रश्न विचारण्यात आला. परंतु आरोपी याने probable असा पूरावा अभिलेखावर आणून फिर्यादी याची आर्थिक कुवत उसनवार रक्कम देण्याइतकी नाही याबाबत कोणताच पूरावा आणलेला नाही. सदर आरोपी हा खटल्यामध्ये हजर झाल्यावर त्याने मागणी नोटीस किंवा फिर्यादी याची फिर्याद नाकारलेली नाही. आरोपी याने मुख्य बचाव घेतला की, फिर्यादी यांनी आरोपीवर दबाव टाकून कोरे १५ धनादेश ताब्यात घेतले व त्याचा दुरूपयोग केला. सदर बचावाच्या अनुशंगाने आरोपी याने फक्त फिर्यादीस प्रश्न सूचित केला आहे. आरोपीवर दबाव टाकल्यावर तसेच धनादेश ताब्यात घेतल्यावर सदर आरोपी यांनी त्या संदर्भात कोणत्याही ठिकाणी तक्रार केलेली नाही.

**२८.** फिर्यादी याने त्यांची बाजू शाबित होण्याकरीता अभिलेखावर वादातील धनादेश, चेक रिटर्न मेमो, उसनवार पावती पुराव्याकामी दाखल केलेला

आहे. फिर्यादी याने अभिलेखावर दावा दाखल करुन तो वादातील धनादेशाचा holder in due course आहे ही बाब शाबीत केली आहे. आरोपी याने बचावादरम्यान सदरचा चेक हा जबरदस्तीने घेतला व फिर्यादी हा सावकारकीचा व्यवसाय करतो असा बचाव घेतला आहे, परंतु सदरचा बचाव आरोपी याने प्राबल्याच्या शक्यतेवर शाबीत केलेला नाही. आरोपीच्या वकीलांनी युक्तीवादादरम्यान दिलेला चेक व त्यावरील सही नाकारली आहे. परंतु त्या अनुषंगाने देखील पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे ***प्रकाश देसाई वि. दत्तात्रय देसाई*** या न्यायनिर्णयामध्ये सांगितल्याप्रमाणे फिर्यादी यांनी कलम १३९ शाबीत करुन वादातील धनादेश हा दायीत्वाची पूर्तता करण्याकरिता दिला होता ही बाब शाबीत केली आहे.

२९. आरोपीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी याने आरोपी यास रक्कम रु. ३,००,०००/- हा रोख स्वरुपात उसनवार पावती करून दिले आहे. परंतु सदरची रक्कम ही income tax return मध्ये दाखवली की नाही, या अनुषंगाने पुरावा दाखल केलेला नाही. Income Tax Act नुसार रक्कम रु. २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) वरील रक्कम ही चेक किंवा ड्राफ्ट किंवा बँकेकडून देण्याचे असते, तसे न दिल्यास तो गुन्हा होतो. फिर्यादीच्या वकीलांनी युक्तिवाद केला की, अभिलेखावर रिटर्न दाखल केले नाही म्हणून उसनवार दिलेली रक्कम ही बेकायदेशीर ठरत नाही. फिर्यादी यांनी आरोपी यास दिलेली रक्कम इनकम टॅक्स रिटर्नमध्ये नमूद केले असलेबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल केली नसली तरी सदरची बाब income tax मध्ये दाखवली नाही म्हणून हातउसनवार म्हणून दिलेली रक्कम ही legally enforceable debt नाही असे म्हणता येणार नाही. फिर्यादी याने सदरची रक्कम income tax मध्ये जर दाखवली नसेल तर तो त्या कायद्यांतर्गत कायदेशीर बाबीला पात्र राहिल.

३०. आरोपी यांनी बचाव घेतला की, वादातील धनादेशावरील नमूद रक्कम ही आरोपी हा फिर्यादी यास कायदेशीर देणे लागत नाही. याच मुद्याच्या अनुशंगाने अभिलेखावर आलेल्या पूराव्याचे अवलोकन करण्यात आले व आरोपी यांनी

घेतलेला बचाव विचारात घेण्यात आला असता, फिर्यादी यांनी आरोपी यास रक्कम उसनवार दिल्यासंदर्भात उसनवार पावती शाबित केलेली आहे. तसेच वादातील धनादेश फिर्यादी यांच्या ताब्यात असून फिर्यादी हा holder in due course असल्याचे शाबित केलेले आहे. आरोपीने प्राबल्याच्या शक्यतेवर पराक्रम्य लेख अधिनियम चे कलम १३९ नुसार खंडण केलेले नाही. त्यामुळे जोपर्यंत विरोधी बाब सिध्द होत नाही, तोपर्यंत सदर चेकची रक्कम ही कायदेशीर देय रक्कम नाही असा तर्क लावता येणार नाही. आरोपी यांनी विरोधी पुरावा देऊन तो कायदेशीर देणे लागत नाही ही बाब शाबीत केलेली नाही. त्यामुळे आरोपी याने पराक्रम्य लेख अधिनियम कलम १३९ नुसार खंडण केले ही बाब शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपीने बचावाच्या युक्तिवादाच्या पृष्ठर्थ दाखल केलेला *Basalingappa Vs. Mudibasappa (२०१९) SCC ४१८* हा न्यायनिर्णय आरोपी याच्या बचावास लागू होत नाही.

**३१.** प्रस्तुतचा खटला हा कलम १३८ अन्वये दाखल केलेला आहे. आरोपी यांनी उसनवार रक्कमेपोटी दिलेले धनादेश हे न वटल्यामुळे सदरचा खटला दाखल करण्यात आलेला आहे. फिर्यादी यांनी पुरावा दाखल करुन आरोपी याने फिर्यादी यास उसनवार रक्कम परतफेडीपोटी वादातील धनादेश दिला. सदरचा धनादेश हा फिर्यादी याने बँकेत वटविण्याकरीता भरला असता तो धनादेश (नि.क्र.१५) न वटता परत आला. फिर्यादी याने आरोपीस नोटीस (नि.क्र.१७) पाठवून देखील आरोपीने फिर्यादीस वादातील धनादेशाची रक्कम परतफेड केलेली नाही. यासर्व बाबी निश्चीतच फिर्यादीने शाबीत केलेल्या आहेत. **त्यामुळे निश्चीतच मुद्दा क्र.१ हा होकारार्थी होत आहे.** परंतू आरोपी याने जो बचाव सदर खटल्याकामी घेतला त्या बचावापोटी अभिलेखावर पुराव्याचा विचार केला असता ज्या रक्कम परतफेडी पोटी वादातील धनादेश देण्यात आला ती रक्कम legally enforceable debt आहे की नाही या अनुषंगाने पुराव्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखावरील पूरावा विचारात घेतला असता, फिर्यादी हा सावकारी व्यवसाय करतो व त्याच व्यवहारातून हा चेक घेण्यात आला. तसेच फिर्यादी यांनी आरोपी यांच्यावर दबाव टाकून, जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून कोरे १५

धनादेश ताब्यात घेतले हा बचाव आरोपी यांनी Preponderance of Probability या तत्वानुसार शाबित केलेला नाही. फिर्यादी यांनी दाखल केलेली उसनवार पावती व त्या अनुशंगाने देण्यात आलेला धनादेश याबाबीचा पूरावा फिर्यादी याची केस शाबित करतो. सदरची रक्कम ही बेकायदेशीर आहे, ही बाब आरोपीने शाबित केलेली नाही.

**३२.** वरील सर्व पुराव्यावरुन फिर्यादी याने धनादेशामध्ये नमूद असलेली रक्कम ही आरोपी यास हातउसणे दिली होती ही बाब पुराव्यानिशी शाबीत केलेली आहे. आरोपी याने वादातील धनादेश हे हातउसणे रक्कम परतफेडीपोटी दिली होती ही बाब देखील फिर्यादी याने शाबीत केली आहे. आरोपी या प्रस्तुत खटल्यामध्ये नोटीस मिळाल्यानंतर हजर होऊन देखील १५ दिवसांमध्ये त्याने वादातील धनादेशाची रक्कम फिर्यादी यास परत दिलेली नाही. आरोपी हा फिर्यादी यास वादातील धनादेशाची रक्कम देणे लागत नाही या गोष्टीचे खंडण प्राबल्याच्या शक्यतेवर आरोपीने केलेले नाही. त्यामुळे पराक्रम्य लेख अधिनियम कलम १३९ च्या गृहीतकेच्या आधारे आरोपी संबंधीत रक्कम फिर्यादीला देणे लागतो याबाबत काही शंका नाही असे या न्यायालयाचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी **मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी** देत आहे.

**३३.** आरोपी हा फिर्यादीस रक्कम रु. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) देणे लागतो ही बाब सिध्द होत असल्याने आरोपीने पराक्रम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ चा शिक्षापात्र अपराध केला हे यशस्वीरीत्या सिध्द झाले आहे. त्यामुळे, आरोपी शिक्षेस पात्र ठरत असल्याने मी शिक्षेच्या मुद्यावर ऐकण्याकरीता न्यायनिर्णय थांबवत आहे.

ARCHANA MANOJ GAIKWAD
Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.07.02 16:09:59 +0530

**दिनांक- ०२/०७/२०२६**
**इचलकरंजी**

**(अर्चना एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३**
**इचलकरंजी, जि. कोल्हापूर.**

**३४.** फिर्यादीचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाला आहे व आरोपीने बरेच दिवसापासुन फिर्यादीची संबंधीत रक्कम वापरलेली आहे व खटला दहा वर्षाहुन अधिक काळ जुना आहे व पराक्रम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम ११७ (क) च्या तरतुदींनुसार आरोपीस प्रस्तुत गुन्हयामध्ये जास्तीत जास्त शिक्षा देवुन धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट नुकसानभरपाई मिळणेची विनंती केली.

**३५.** आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती एस. जी. मुसळे यांनी असा युक्तीवाद केला की आरोपी हा घरातील एकमेव कमावता व्यक्ती असुन त्याचेवर कुटुंबातील त्यांची आई व दोन मुले हे सदस्य अवलंबुन असून त्यांची पत्नी मयत झालेली आहे. तसेच आरोपीची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे. त्यामुळे, दयाळु दृष्टीकोन ठेवुन आरोपीस कमीत कमी शिक्षा व दंड करण्यात यावा अशी विनंती केली.

**३६.** पराक्रम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ चा विचार करता न्यायालय जास्तीत जास्त दोन वर्ष कारावास आणि धनादेशाच्या दुप्पट रक्कम दंड अशा स्वरुपाची शिक्षा पारीत करु शकते. प्रस्तुतच्या प्रकरणाचे स्वरुप पाहता जो व्यक्ती धनादेशाचा वापर करत आहे त्याने त्याचा वापर कायदेशीरपणे करणे गरजेचे आहे. तसेच, धनादेशाचा उपयोग हा कायदेशीर असलेले देणे पुढे ढकलण्याकरीता न करता, त्याचा योग्यवेळी व योग्य ठिकाणी वापर करुन धनादेशाच्या व्यवहाराची विश्वासार्हता वाढवणे गरजेचे आहे. फिर्यादीने आरोपीस रक्कम देवुनही आरोपीने त्याची परतफेड कबुल केल्याप्रमाणे वेळेत केली नाही. तसेच, सदर रक्कम मिळणेकामी आरोपीने फिर्यादीस न्यायालयाचे दार ठोठावणेकरीता भाग पाडले आहे व खटला दहा वर्षाहुन अधिक जुना आहे व एकंदरीत यासर्व बाबींचा विचार करता आरोपीस योग्य ती शिक्षा देणे जरुरीचे आहे.

**३७.** शिक्षा देताना आरोपीचे वय, त्याने केलेले कृत्य, व त्यांनी यापुर्वी केलेले गुन्हे व त्याचे भविष्य व त्यास देण्यात येणाऱ्या सुधारणेची संधी या सर्व

बाबींचा प्रामुख्याने विचार करता जरी फिर्यादीचे विद्वान विधीज्ञ यांनी पराक्रम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम ११७ (क) नुसार नुकसान भरपाई ही चेकची दुप्पट रक्कम मागितली असली तरी देखील न्यायालयास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ (३) नुसार योग्य ती नुकसान भरपाई बाबत योग्य ते आदेश पारीत करण्याचा अधिकार आहे. संबंधीत सदर तरतुदीचा विचार न्यायालयाने केला आहे. एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता आरोपीला २ महिने साधा कारावासाची शिक्षा देणे न्यायोचीत वाटत आहे. आरोपी याची आर्थीक बाजू चांगली असती तर त्याने आतापर्यंत नक्कीच चेकची रक्कम फिर्यादी यास दिली असती, परंतु आरोपी यांच्या आर्थिक बाजुचा विचार करता, नुकसान भरपाई रक्कम रु. १०,०००/-(रुपये दहा हजार फक्त) देणे योग्य होईल. त्यामुळे, फिर्यादीला आरोपीकडुन येणे असणारी धनादेशावरील रक्कम रू. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) व नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये १०,०००/- अशी एकुण ३,१०,०००/- (रुपये तीन लाख दहा हजार फक्त)रुपये ही आरोपीने फिर्यादीला नुकसान भरपाई म्हणून द्यावेत असा निर्देश दिला जातो. सबब, मी खालील आदेश पारित करते-

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी **सदानंद शंकर ढवळे** यांना पराक्रम्य लेख अधिनियम,१८८१ चे कलम १३८ प्रमाणे शिक्षापात्र अपराधासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५५ (२) मधील प्रावधानीत तरतुदीनुरुप दोषी ठरवण्यात येत आहे. |
| २. | आरोपी यांना पराक्रम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ प्रमाणे केलेल्या शिक्षापात्र अपराधाकरीता २ (दोन) महिने साध्या कारावासाची शिक्षा आणि दंड रक्कम रु. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे. |
| ३. | आरोपी यांनी दंडाची रक्कम रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) व नुकसान भरपाईची रक्कम रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) अशी एकत्रीत असणारी रक्कम रुपये ३,१०,०००/- (रुपये तीन लाख दहा हजार फक्त) फिर्यादीस फौजदारी प्रक्रिया |

| | |
|---|---|
| | संहिता चे कलम ३५७ (३) नुसार नुकसान भरपाई म्हणून आजपासुन एक महिन्याच्या आत द्यावी. सदर रक्कम देण्यास आरोपीने कसुर केल्यास आरोपीला आणखी १० दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते. |
| ४. | जर आरोपीने N. I. कायद्याच्या U/s.१४३-अ अंतरिम भरपाईसाठी किंवा चेकच्या रकमेसाठी कोणतीही रक्कम भरली असेल, तर ती एकूण नुकसान भरपाईमधून वजा केली जाईल. |
| ५. | आरोपीने वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबा न्यायालयाच्या स्वाधीन करावा. |
| ६. | सदर न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला)**

ARCHANA MANOJ GAIKWAD

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.07.02 16:10:08 +0530

**दिनांक- ०२/०७/२०२६.**
**इचलकरंजी**

**(अर्चना एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,**
**इचलकरंजी, जि. कोल्हापूर.**